# प्रेस नोट दिनांक - ०३/०५/२०१९

## घरकामासाठी नोकर पुरवण्याच्या (मेड सर्व्हीस) बहाण्याने ३० ते ३५ नागरीकांची फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर क्राईम सेलने केली अटक

बावधन, पुणे येथे राहणाऱ्या एका वयोवृध्द दांपत्यास घरकामासाठी मेडची आवश्यकता होती. त्यामुळे पश्चिम बंगाल येथे हवाईदलात असणाऱ्या त्यांच्या मुलाने गुगलवर सर्च केले असता त्यांना मे. रुद्रसाई इंटरप्रायझेस पुणे या मेड सर्व्हीस एजन्सी बाबत माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी सदरच्या मेड एजन्सीशी संपर्क केला असता मे. रुद्रसाई इंटरप्रायझेसकडुन व्हॉटसअॅपव्दारे त्यांना एजन्सीचे कागदपत्रे पाठविण्यात आली. सदरच्या कागदपत्रामुळे अर्जदार यांना सदरची कंपनी हि खरी असल्याबाबत खात्री पटली. तसेच अर्जदार यांना नोकरीमध्ये सुट्टी मिळत नसल्याने त्यांनी इतर चौकशी न करता मे. रुद्रसाई इंटरप्रायझेसशी तात्काळ व्यवहार ठरविला. रुद्रसाई इंटरप्रायझेसव्दारे अर्जदार यांना एजन्सीचे कमिशन व सेवीकेचे दरमाह वेतन असे मिळुन २६,०००/- रुपये आर.एस. इंटरप्रायझेसच्या अकाऊंटवर भरण्यास सांगितले. त्याप्रमाणे अर्जदार यांनी पैसे भरले. परंतु सेवीका घरी न आल्याने संबंधीत वृध्द दांपत्याने त्यांच्या मुलास कळविले. त्यांच्या मुलाने रुद्रसाई इंटरप्रायझेसला फोन करुन त्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याव्दारे उडवाउडवीची कारणे सांगण्यात आली. त्यानंतर रुद्रसाई इंटरप्रायझेसव्दारे अर्जदाराचे फोन नंबर ब्लॉक करण्यात आल्याने त्यांना फसवणुक झाल्याचे लक्षात आले व त्यांनी पुणे सायबर क्राईम सेलशी संपर्क साधुन सदरबाबत तक्रार दिली.

पुणे सायबर क्राईम सेलव्दारे सदर तक्रारीवरुन मे. रुद्रसाई इंटरप्रायझेसबाबतची संपुर्ण माहिती मागविण्यात आली. सदरच्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करता सदरची एजन्सी हि बनावट असल्याचे दिसुन आले. इतर तांत्रिक माहितीचे विश्लेषण केले असता रुद्रसाई इंटरप्रायझेस या एजन्सीच्या नावाने विक्रम आत्तार सिंग हा सराईत गुन्हेगार फसवणुक करत असल्याचे दिसुन आले. तसेच त्याने अश्याच प्रकारचे इतर गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने सर्व प्रकरणांची माहिती एकत्रित करुन त्याचे विश्लेषण करुन आरोपीचा शोध सुरु केला असता आरोपी कायम जागा बदलत असल्याचे दिसुन आले. सायबर क्राईम सेलकडील पथकाने परिश्रम घेवुन आरोपी नामे  विक्रम आत्तार सिंग वय-३२ वर्ष रा. काळेपडळ, हडपसर, पुणे मुळ भरतपुर राजस्थान हा गोव्याला पळुन जाण्याच्या बेतात असताना त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी करता त्याने आत्तापर्यन्त ३० ते ३५ लोकांची अंदाजे ३० लाख रुपयांची फसणुक केल्याचे आढळुन आले. त्याच्याकडुन गुन्ह्यात वापरण्यात आलेले ४ मोबाईल व १ डेबीटकार्ड हस्तगत करण्यात आले आहे. आरोपीने बिबवेवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. २९/२०१९ भा.दं.वि.कलम ४२० हा गुन्हा देखील केल्याचे निष्पन्न झाल्याने पुढील तपासकामी त्यास बिबवेवाडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. तसेच सायबर सेलव्दारे इतर पिडीतांचा शोध सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. संभाजी कदम, पोलीस उप-आयुक्त, श्री. निलेश मोरे, सहा. पोलीस आयुक्त, श्रीमती राधिका फडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. जयराम पायगुडे, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सागर पडवळ, पोलीस उप-निरीक्षक, कर्मचारी राहुल हंडाळ, शिरीष गावडे, संतोष जाधव, शितल वानखेडे यांनी केली.

सायबर सेलव्दारे अवाहन करण्यात येते की, मेडची आवश्यकता असल्यास प्रत्यक्षात जावुन संबंधीत एजन्सीची पुर्णपणे चौकशी करावी त्यानंतरच पैशांचा व्यवहार करावा. तसेच आय.डी.बी.आय. बॅंक अकाऊंट नं. ०१०२१०२००००२७७३३, एच.डी.एफ.सी. बॅंक अकाऊंट नं. ५०१००२२१३७९४७५, युनियन बॅंक अकाऊंट नं. ६१६९०१०१००५०६२३, आय.सी.आय.सी.आय. बॅंक अकाऊंट नं. २३९२०१५०१०४९ व मोबाईल नंबर ९८२२४१६२००, ९६७३८३९२०२, ७६२००७९०११, ९६०७८२१२५७, ९५७९०८८९३९, ६३८७१९६८४९, ९६८९९५८२८१ याव्दारे कोणाची फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर येथे संपर्क साधावा.

(संभाजी कदम) ३/५
पोलीस उप-आयुक्त,
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर